| योजनेचे नाव | राज्यातील शेतकरी उत्पादक कंपनीतील शेतकरी सभासद व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे करिता क्षमता बांधणी प्रशिक्षण |
|---|---|
| **योजनेची सुरुवात** | २०२३-२४ |
| **लाभार्थी लक्षांक** | १५० |
| **योजनेचा उद्देश** | • शेतकरी उत्पादक कंपनी किंवा शेतकरी गट यांचे आदर्श व्यवस्थापन कसे करावे.<br>• शेतकरी उत्पादक कंपनींना वित्त पुरवठा वैज्ञानिक प्रतिपूर्ती, कंपनीचे वित्तीय नियोजन व व्यवस्थापन विकास आराखडा तयार करणे.<br>• कृषि माल निर्यातीमध्ये शेतकरी उत्पादक कंपनींना वाव, संधी व कार्यप्रणाली.<br>• शेतकरी उत्पादक कंपनींच्या माध्यमातून सभासदांना शाश्वत निविष्ठा पुरवठा.<br>• बाजाराची गतिशीलता समजवुन घेणे.<br>• शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून शेतमालाची ऑनलाइन विक्री व्यवस्था.<br>• कृषि मालाचे विपणन, साठवणूक, प्रक्रिया, मूल्यवर्धन व मुल्यसाखळी तयार करणे.<br>• शेतकरी उत्पादक कंपनी सभासद सुसंवाद घडवून आणणे व मार्गदर्शन करणे.<br>• व्यवसायिक जोखीम व वित्तीय व्यवस्थापन.<br>• केंद्र व राज्य पुरस्कृत शेतकरी उत्पादक कंपनीसाठी विविध योजना शेतकरी उत्पादक कंपनी सक्षम व्हावी, ती शाश्वत चालावी व त्यामध्ये शेतकऱ्यांचा सक्रीय सहभाग असावा यासाठी सारथी संस्थेमार्फत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी वरील उद्दीष्ट्यांच्या आधारे योजना कार्यान्वित केलेली आहे. |
| **योजनेचे स्वरूप** | सारथी लक्षित गटातील (मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा) शेतकरी उत्पादक कंपनी संचालक, सभासद व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यामध्ये पाच दिवसीय निवासी प्रशिक्षणाची विनाशुल्क प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. यामध्ये शेतकरी |

| | |
|---|---|
| | उत्पादक कंपनीशी निगडीत विविध विषयतज्ञाचे मार्गदर्शन, प्रशिक्षण साहित्य, चहा, नाष्टा, भोजन, निवास, क्षेत्रीय भेट व प्रमाणपत्र इत्यादी बाबी चा समावेश आहे. |
| **प्रशिक्षण ठिकाण** | महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, वर्धा,नागपुर, दापोली जि-रत्नागिरी |
| **प्रशिक्षण कालावधी /टप्पे** | ०५ दिवसीय निवासी प्रशिक्षण |
| **लाभार्थी पात्रता** | • शेतकरी उत्पादक कंपनी सभासद हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.<br>• प्रशिक्षणासाठी पात्र व्यक्ती ही मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा, या लक्षित गटातील असावी व शेतकरी उत्पादक कंपनीचा सभासद असावा.<br>• प्रशिक्षणासाठी पात्र लक्षित गटातील व्यक्ती आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय (EWS) /नॉन क्रीमिलीयर गटातील असावी. अथवा सदर सभासद शेतक-यांचे मागील ३ वर्षाचे वार्षिक उत्पन्न हे र.रु.८.०० लाखापेक्षा जास्त नसावे. याबाबत, संबधित तहसीलदार यांचा उत्पन्नाचा दाखला असावा.<br>• उत्पादक कंपनीची कंपनी कायदा २०१३ नुसार Register of Company (RoC) कडे नोंदणी झालेली असावी.<br>• कंपनीच्या भागधारकांची संख्या ५० पेक्षा कमी नसावी.<br>• शेतकरी हा नाबार्ड /किंवा इतर शासकीय योजनेद्वारे प्रशिक्षणासाठी अनुदान प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीचा सभासद नसावा.<br>• एका कंपनीतील जास्तीत-जास्त पाच व्यक्ती प्रशिक्षणासाठी सहभागी होऊ शकतात.<br>• सारथी, पुणे मार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत या प्रकारच्या बाबीचा लाभ याअगोदर घेतलेला नसावा.<br>• योजनेच्या अटी शर्तीची पूर्तता होत नसल्यास अपात्र ठरविण्यात येईल. |
| **आवश्यक कागदपत्रे** | .<br>• प्रशिक्षणासाठी पात्र लक्षित गटातील व्यक्ती आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय (EWS) /नॉन क्रीमिलीयर प्रमाणपत्र किंवा तहसीलदार यांचा उत्पन्नाचा दाखला . |

| | |
|---|---|
| | <ul><li>कंपनीच्या भागधारकांची संख्या ५० पेक्षा कमी नसावी.ROC कडे सदर केलेली यादी जोडावी.</li><li>शेतकरी हा नाबार्ड /किंवा इतर शासकीय योजनेद्वारे प्रशिक्षणासाठी अनुदान प्राप्त शेतकरी उत्पादक कंपनीचा सभासद नसल्याबाबत self declaration दयावे.</li><li>एका कंपनीतील जास्तीत-जास्त पाच व्यक्ती प्रशिक्षणासाठी सहभागी होऊ शकतात.प्रत्येक प्रशिक्षणार्थीचे ,जात प्रमाणपत्र आणि तहसीलदार यांचा उत्पन्नाचा दाखला स्वतंत्र जोडावा.</li><li>प्रशिक्षणासाठी पाच व्यक्तींची नावे कंपनीच्या लेटरहेडवर एकत्रित असल्याचे पत्र जोडावे.</li><li>विहित नमुन्यातील व फोटोसाहित परिपूर्ण अर्ज</li><li>जातीचे प्रमाणपत्र</li><li>उत्पादक कंपनीची कंपनी कायदा **२०१३** नुसार **Register of Compan (RoC)** कडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र</li><li>रहिवासी प्रमाणपत्र</li><li>आधारकार्ड</li><li>शाळा सोडल्याचा दाखला</li><li>शेतकरी उत्पादक कंपनीचा सभासदअसल्याचा पुरावा जोडावा.**ROC** कडे केलेल्या यादीत नाव असल्याची यादी जोडावी.</li></ul> |
| <ul><li>**लाभार्थी निवड प्रक्रिया**</li></ul> | <ul><li>लाभाकरिता ऑनलाईन अर्ज भरण्या करिता जाहिरात सारथीचे संकेत स्थळावर व राज्यातील वर्तमानपत्रा मध्ये जाहिरात प्रसिद्ध केली जाईल.</li><li>शेतकरी उत्पादक कंपनीद्वारे प्राप्त अर्जांपैकी मुल्यांकनाद्वारे अधिक गुणांक प्राप्त करणाऱ्या राज्यातील १५० शेतकरी उत्पादक कंपनीच्या ल गटातील संचालक/सभासद/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सन २० २६ मध्ये प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येणार आहे.</li><li>कुटुंबातील जास्तीत जास्त एकच सदस्यांची प्रशिक्षणाकरिता निवड केली जाईल.</li><li>सदर प्रशिक्षण ही मोफत राहील.</li></ul> |
| **लाभाचे स्वरूप :** | सारथी लक्षित गटातील (मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा,) शेतकरी उत्पादक कंपनी संचालक, सभासद व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यामध्ये पाच दिवसीय निवासी प्रशिक्षणाची विनाशुल्क |

| | |
|---|---|
| | प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. यामध्ये शेतकरी उत्पादन कंपनीशी निगडीत विविध विषयतज्ञाचे मार्गदर्शन, प्रशिक्षण साहित्य, चहा, नाश्ता, भोजन, निवास, क्षेत्रीय भेट व प्रमाणपत्र इत्यादी बाबी चा समावेश आहे. प्रशिक्षण संस्थेस सारथी मार्फत प्रती प्रशिक्षणार्थी रक्कम रूपये १००३०/- अदा करण्यात येते. |
| **प्रशिक्षण संस्थेबाबत :** | • सदर प्रशिक्षण महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांच्यामार्फत पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, वर्धा,नागपुर, दापोली जि-रत्नागिरी ठिकाणी प्रशिक्षण आयोजित केले जाईल.<br>• प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शेतकरी उत्पादक कंपनींना पुढील दोन वर्षे निशुल्क मार्गदर्शन महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मार्फत करण्यात येणार आहे. त्यामध्ये संबंधितांना व्यवसायिक संधी उपलब्ध करून देणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, निविष्ठा पुरवठा, मार्केट लिंकेजेस, इक्विटी ग्रॅन्ट, प्रोपोझल, शेतकरी उत्पादक कंपनी निगडीत योजना, बँक व वित्तीय संस्थांकडून निधी उपलब्धता, शेतकरी उत्पादक कंपनीशी निगडीत शासकीय अधिकारी इतर स्टेक होल्डर यांच्या मध्ये समन्वय साधने इत्यादी सेवा पुरविण्यात येणार आहे. अवश्यकता असल्यास या संस्थांना कालानुरूप विविध नाविन्यपूर्ण विषयाचे पुन्हा पुढील आर्थिक वर्षात शेतकरी उत्पादक कंपनीच्या प्रगतीच्या आधारे प्रशिक्षणाची अतिरिक्त सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. |
| **अपात्रतेचे निकष** | • कागदपत्रे अपूर्ण असणे व विहित मुदतीत सादर न करणे.<br>• ऑनलाइन अर्ज भरताना खोटी किंवा चुकीची माहिती भरणे.<br>• सारथी अंतर्गत या उपक्रमातून या पूर्वी या प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला असल्य<br>• वयोगटात बसत नसल्यास<br>• नियमांचे उल्लंघन केल्यास |
| **२०२३-२४ ते<br>२०२४- २०२५<br>लाभार्थी संख्या** | १३१ |